*नियमित दिवाणी दावा क्र. १०/२०१७*
*बळीराम इंदूलकर विरुध्द*
*काशिराम चंदर पवार वगैरे .*
*CNR NO.MHRG16000562017.*

**नियमित दिवाणी दावा क्र.१०/२०१७**

**निशाणी क्र.२९ वरील आदेश**

(दिनांक ११ डिसेंबर २०२३ रोजी पारीत.)

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम १७ अन्वये न्यायालयीन आयुक्त यांच्या अहवालानुसार दाव्यात दुरुस्ती करण्याची विनंती केली आहे.

०२. वादी यांच्या कथनानुसार, सदरचा दावा अतिक्रमण दुर करुन अतिक्रमित जागेचा कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. मौजे–हरनेरी, ता.सुधागड, जि.रायगड येथील सर्व्हे क्र.४०/५ आणि ४०/४ या दावा मिळकतींचे उत्तर– पश्चिम हद्दीत प्रतिवादी क्र.१ व २ यांनी ४० X ३० फुट रुंदीचे अतिक्रमण करुन घर बांधकाम केले आहे. पुढे वादी कथन करतो की, दिनांक १०/१२/२०१९ रोजी न्यायालयीन आयुक्तांमार्फत दावा मिळकतीची मोजणी होवून प्रतिवादींचे अतिक्रमण दाखविणारा नकाशा सादर करण्यात आला आहे. सदर दाखल असलेल्या नकाशाप्रमाणे वादीने दाव्यामध्ये दुरुस्तीसाठी परवानगी मागितलेली आहे.

०३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करुन सक्त हरकत नोंदविली आहे.

०४. उभयपक्षकारांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. वादी हे न्यायालयीन आयुक्तांनी नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे अतिक्रमित क्षेत्राची बाब दाव्यामध्ये नमुद करुन त्यानुसार दुरुस्ती करण्यास परवानगीची मागणी करीत आहे. वादी मागणी करीत असल्याप्रमाणे दुरुस्ती ही वाद कथनाचे योग्य अवलोकन होण्यास मदत होणार आहे. वादी मागणी करीत असलेल्या दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपामध्ये अथवा प्रतिवादीच्या बचावामध्ये कोणताही फरक पडणार नाही. वादी मागणी करीत असलेल्या दुरुस्तीमुळे दोन्ही पक्षकारांतील वाद गुणदोषावर न्यायनिर्णय होण्यास मदत होईल असे मला वाटते म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

:: **आ दे श** ::

०१. वादी यांचा अर्ज नि.क्र.२९ मंजूर करण्यात येतो.

०२. वादी यांनी मागणी केल्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करुन तशी दुरुस्ती दाव्याची प्रत पुढील तारखेपर्यंत अथवा त्यापूर्वी सादर करावी.

सही/-

**पाली.** **(मीना वामन जाधव)**

**दिनांकः ११.१२.२०२३.** **दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, पाली.**